## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१६०/२०१० मधील
## निशाणी क्र.१५० वर आदेश
**CNRNO.MHLA110006952010.**

०१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

०२. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी अर्जामध्ये नमुद साक्षीदाराला साक्षीसमन्स काढण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जाला वादींनी म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे साक्षी यादी प्रकरणात दाखल नाही. त्यामुळे अर्ज चालु शकत नाही. सदर प्रकरणातील दावा हा मिळकतींच्या वाटपाकरिता दाखल असुन पक्षकारांमध्ये नातेसंबंधाबाबत महत्वाचे वाद आहेत. त्यामुळे सदर प्रकरणातील दाव्यातील व कैफियतमधील कथन विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी साक्षीदारांची यादी दाखल केलेली नसली तरी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टिने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना बचावाच्या अनुषंगाने पुरावा दाखल करण्यास संधी देणे न्यायोचित होणार आहे. तसेच अर्जात नमुद साक्षीदार साक्षीसाठी हजर झाल्यानंतर त्याबाबत बाजु मांडण्याची वादींना संधी मिळणार आहे. सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. नि.क्र.१५० वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ कडुन नियमाप्रमाणे साक्ष भत्ता स्वीकारुन अर्जात नमुद साक्षीदाराला अर्जात नमुद कागदपत्रांसह साक्षीसाठी हजर राहण्याकरिता साक्षीसमन्स काढावे.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2020.12.05 15:44:05 +0530

दि.०५.१२.२०२०.

(शिवकांत म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.